मानीव अभिहस्तांतरणातील अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने कागदपत्रे निश्चित करणे.

# महाराष्ट्र शासन

## गृहनिर्माण विभाग

## शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१/दुवपु-२

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १८ सप्टेंबर, २०१७

**वाचा -**

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१/दुवपु-२, दि. १४ जून, २०१६.

**प्रस्तावना -**

संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१/दुवपु-२, दि. १४ जून, २०१६ अन्वये अर्जदार संस्थेने मानीव अभिहस्तांतरणाच्या अर्जासोबत एकूण ८ (आठ) कागदपत्रे आवश्यक राहतील असा निर्णय घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील मानीव अभिहस्तांतरणाच्या अर्जासोबत अर्जदार संस्थेने सादर करावयाच्या कागदपत्रातील अनुक्रमांक ७ नुसार नियोजन प्राधिकरणाने प्रमाणित केलेले बांधकाम पूर्णत्व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. आता महाराष्ट्र राज्यात दि. ०१ मे, २०१७ पासून महाराष्ट्र स्थावर संपदा (विनियमन व विकास) कायदा अंमलात आला असून सदर अधिनियम व त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार ज्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले नाही अश्या इमारतींची नोंदणी गृहनिर्माण प्राधिकरणाकडे करणे आवश्यक आहे. त्यामुळे महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे मानीव अभिहस्तांतरणासंदर्भात अनेक तक्रारी प्राप्त होण्याची शक्यता विचारात घेऊन संदर्भीय शासन निर्णयाच्या अनुषंगाने सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय-

संदर्भीय शासन निर्णयातील मानीव अभिहस्तांतरणच्या अर्जासोबत सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रातील अनुक्रमांक ७ येथील प्रमाणपत्राऐवजी खालील मजकुराचा समावेश करण्यात येत आहे.

"मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया सुलभ करण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण संस्थेकडून भोगवटा प्रमाणपत्राऐवजी इमारतीचा प्रत्यक्ष ताबा घेण्यात आल्याचे तसेच सदर इमारतीच्या संदर्भात असलेल्या सर्व जबाबदाऱ्या/दायित्व स्विकारण्यास तयार असल्याचे स्व-प्रमाणपत्र घेण्यात यावे. मानीव अभिहस्तांतरण प्राप्त झाल्यानंतर संस्थेने मुंबई महानगरपालिका किंवा संबंधित नागरी स्थानिक संस्थेकडे भोगवटा प्रमाणपत्रासाठी अर्ज करावा."

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९१८१५५१५८२७०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Suhas Madhav Mamdapurkar
Date: 2017.09.18 15:42:26 +05'30'

(सुहास ममदापूरकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल मुंबई.(पत्राने)
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई-३२.
३. मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२.
६. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय,मुंबई-३२.
७. सर्व विभागीय आयुक्त.
८. सर्व महापालिका आयुक्त/प्रशासन.
९. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद
१०.नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११.निबंधक तथा सहकार आयुक्त, पुणे.
१२.उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१३.व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई.
१४.मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१५.सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई.
१६.सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था.
१७.सर्व सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१८.निवड नस्ती (दुवपू-२). गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया दिनांक १.५.२०१४ पासून ऑनलाई न करण्याबाबत.

महाराष्ट्रशासन,
सहकार, पणनव वस्त्रोद्योगविभाग,
शासनपरिपत्रकक्रमांक:सगृयो २०१३/अनौ-०२/प्र.क्र.२३५/१४स
मंत्रालयविस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- .२९ एप्रिल, २०१४.

**प्रस्तावना :-**

नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांचे अभिहस्तांतरण बिल्डर करुन देत नाहीत किंवा बिल्डर सहकार्य करीत नाही, अशा प्रकारच्या अनंत तक्रारी संस्थांकडून शासनास व सहकार आयुक्त कार्यालयास प्राप्त होत होत्या. त्यामुळे महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ व नियम १९६४ मध्ये काही सुधारणा करणे आवश्यक असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली. त्यानुसार सहकारी गृहनिर्माण संस्थांचे अभिहस्तांतरण करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ व नियम १९६४ मध्ये सुधारणा करुन शासन राजपत्र प्रसिध्द केले आहे.

त्यानुसार मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी पूर्णत: ऑनलाईन पध्दतीने करावयाची असल्याने त्यानुसार खालीलप्रमाणे निदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**परिपत्रक :-**

**मानीव** अभिहस्तांतरणासंदर्भात येत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यासंदर्भात सहकार विभागाकडून विशेष मोहिम टप्पा-२ यशस्वी होणेसाठी (१ मानीव अभिहस्तांतरण मोहिमेमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून सहज व सुलभ पध्दतीने ऑनलाईन अर्ज भरता यावे यासाठी ऑनलाईनपध्दतीचा अवलंब करणे व (२ ऑनलाईन पध्दतीने मानीव अभिहस्तांतरणाची प्रक्रिया राबविण्यासाठी संगणक आज्ञावली (Software) तयार करण्याची कार्यवाही गृहनिर्माण व महसूल विभागाच्या सल्ल्याने सहकार विभागाने तयार करावयाची होती. त्यानुसार आवश्यक ती संगणक आज्ञावली तयार करण्यात आली असून मानीव अभिहस्तांतरणाचे काम ऑनलाईन करण्याची प्रक्रियापूर्ण झालेली आहे. तसेच मुंबईतील व राज्यातील सर्व जिल्हा उप निबंधक व त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना ऑनलाईन काम करण्याचे प्रशिक्षण महाऑनलाईन मार्फत देण्यात आलेले आहे. यास्तव यापुढे मानीव अभिहस्तांतरणाचे काम केवळ ऑनलाईन पध्दतीनेच करावयाचे असल्याने **मानीव अभिहस्तांतरणाचे सर्व अर्ज, मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी दिनांक १ मे, २०१४ पासून केवळ ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारण्यात यावेत.**

शासनाचे हे आदेश सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी सर्व जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, यांच्या तात्काळनिदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
(अ.शं.भुजबळ)
कार्यासन अधिकारी

र आयुक्त व निबंधक, निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे,
हनिबंधक, सहकारी संस्था
जल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था
नस्ती.